# एम. जी. एम. अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयात तांत्रिक सत्रांचे यशस्वी आयोजन

शैक्षणिक गुणवत्ते सोबतच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा या हेतूने जागतिक आहार दिनाचे औचित्य साधत महाविद्यालयात दि. १९.१०.२०१८ रोजी "आपली आजची कृती, आपल उद्याच भविष्य ठरवेल आणि उपासमार मुक्त जग" या संकल्पनेवर आधारित अन्न पदार्थ् संशोधन आणि विकास, पोष्टर प्रेझेन्टेशन आणि बौद्धिक प्रश्नमंजुषा ई. स्पर्धांचे तसेच दि. २०.१०.२०१८ रोजी तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. औद्योगिक अन्नतंत्रज्ञान क्षेत्रात संशोधनातील गरज आणि संधी या विषयावर श्री. वाल्मिक कर्डिले, उपव्यवस्थापक (संशोधन आणि विकास विभाग) टाटा केमिकल्स, पुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षण घेत असतांना विविध प्रशिक्षनांचे महत्व आणि प्रशिक्षणातून आलेल्या अनुभवातून नोकरीच्या उत्तम संधी कश्या निर्माण होतात यासंबंधी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील अन्न् तंत्रज्ञान विभागातील प्रा. सिद्धार्थ लोखंडे यांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला तर ओरार फ्लेवर चे व्यवसाय विकास व्यवस्थापक श्री. सतीश बोरखडे यांनी अन्न घटक विपणन क्षेत्रातील नोकरीच्या संधी या विषयावर विशेष मार्गदर्शन केले. अन्नप्रक्रिया उद्योगातील मूल्यवर्धन, गुणवत्ता व दर्जा, संशोधन व विकास आणि विपणन इत्यादी महत्वाच्या विभागांवर मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधत प्रश्नांचे निरसन केले. महाविद्यालयातील चारही वर्षांतील विद्यार्थ्यांचा या सत्रांस उत्स्फूर्त प्रतिसाद होता. अश्या सत्रांतून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारूण त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासोबतच व्यावहारिक ज्ञानकक्षा रुंदावतात असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. रवींद्र काळे यांनी अध्यक्षीय भाषणातून केले. डॉ. जाजू आणि प्रा. भोसले यांनी कार्यक्रमाचे संयोजक म्हणून; तर प्रा. कदम यांनी निवेदक म्हणून काम पहिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद व कर्मचाऱ्यांनी योगदान दिले.